- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर  संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- २३ कॅरेट : १,५१,३५० /-
- चांदी : २,४५,३००/-

**Hotel Mai VilLa**
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९१ | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# इंडिया आघाडीची आज बैठक

## एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत समोर आलेल्या मतभेदांबाबत विरोधकांच्या रणनीतीवर चर्चा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
दिल्लीमध्ये उद्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. यात स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन म्हणजेच एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत समोर आलेल्या मतभेदांबाबत विरोधकांच्या रणनीतीवर चर्चा होईल. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव बैठकीला उपस्थित राहणार नाहीत. त्यांच्या जागी पक्षाचा दुसरा नेता उपस्थित राहील.
दरम्यान, शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी होतील. पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितले की पक्ष मुंबईत ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात होणाऱ्या आंदोलनाच्या तयारीत व्यस्त आहे. शिवसेना (उबाठा) दीपके यांच्या सीजेपीच्या आंदोलनालाही समर्थन देईल. इंडिया आघाडीची गेल्या ३ वर्षांतील ही ८ वी बैठक असेल. तसेच, या वर्षातील ही दुसरी बैठक असेल. यापूर्वी ८ जून रोजी एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या स्वातंर्त्याच्या मुद्द्यावर विरोधी पक्षांची बैठक झाली होती. मात्र, त्यात आप आणि डीएमके सहभागी झाले नव्हते.




सपाने सांगितले की, अखिलेश यादव ३० सप्टेंबर रोजी लखनऊमध्ये आयोजित शेतकऱ्यांच्या संमेलनात सहभागी होणार आहेत. पक्षाच्या म्हणण्यानुसार, अखिलेश यांनी याबाबत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी चर्चाही केली आहे. दरम्यान, काँग्रेसचे महासचिव के.सी. वेणुगोपाल यांनीही सांगितले की, आधीपासून ठरलेल्या कार्यक्रमामुळे अखिलेश बैठकीला उपस्थित राहू शकणार नाहीत. त्यांनी राज्यसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्जाशी संबंधित व्यस्ततेचा उल्लेख केला.

**ममता, तेजस्वी यादव यांच्यासह अनेक नेते उपस्थित राहणार**

इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेसकडून पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी सहभागी होऊ शकतात. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या येण्याचीही अपेक्षा आहे. याशिवाय, राजदकडून तेजस्वी यादव, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला आणि सीपीआय (एम)चे महासचिव एम. ए. बेबी बैठकीत सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

**संसदेत सीईसी विरोधात प्रस्ताव आणण्यावर चर्चा होणार**

बैठकीत एसआयआरवरून निवडणूक आयोगाच्या अंतर्गत समोर आलेल्या मतभेदांवर चर्चा होईल. यासोबतच उएउ ज्ञानेश कुमार यांना हटवण्याच्या मागणीसंदर्भात पुढील रणनीतीवरही चर्चा होऊ शकते. काही वृत्तांनुसार, बैठकीत संसदेत त्यांच्याविरोधात प्रस्ताव आणण्याबाबत आणि विरोधी पक्षांच्या संयुक्त कारवाईवरही चर्चा होऊ शकते.

**थोडक्यात**

## चणे, तूर, मूग, वाटाणे महागले

**नवी दिल्ली/मुंबई :** दसरा-दिवाळीसाठी काही दिवसच राहिले आहेत. दसरा-दिवाळी म्हटले की, सर्वांच्या घरात गोडधोड पदार्थ बनवले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने डाळ, तेल, तूप आणि इतर किराणा वस्तूंचा वापर होतो. यंदा कडधान्यांसोबतच डाळीचे दर मात्र गगनाला भिडले आहेत. चणे असो की तूर, मूग आणि वाटाणे, गेल्या महिनाभरात प्रमुख कडधान्यांच्या घाऊक किमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात सर्वसामान्यांच्या खर्चात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. इंडियन पल्सेस अँड ग्रेन्स असोसिएशनच्या (आयपीजीए) आकडेवारीनुसार, गेल्या महिन्यात चण्याच्या किमतीत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मूग १०.६ टक्के, तूर ६.५ टक्के, तर मटारच्या किमतीत सहा टक्के वाढ झाली आहे. रोजच्या स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या या कडधान्यांच्या किमती गेल्या आठवडाभरात तीन ते पाच टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि पुढे देखील दरामध्ये काही दिलासा मिळणार नसल्याचा अंदाज आहे. सणासुदीच्या दिवसांत बाजारात किराणा आणि खाद्यपदार्थांची मागणी वाढते. त्यामुळे डाळींच्या किमतींवर त्याचा काहीसा परिणाम होतो.

# दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची दहावी-बारावी बोर्ड परीक्षेची फी माफ

## महाराष्ट्र बोर्डाकडून परिपत्रक जारी

**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत.शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर २०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत निर्णय बोर्डाकडून घेण्यात आला आहे.
शासन निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित बारावी आणि दहावी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्याकडून पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना बोर्डाकडून परिपत्रक काढून देण्यात आले आहेत.
याबाबत राज्य मंडळामार्फत पुढील सविस्तर सूचना निर्गमित करण्यात येतील. तरी आपणामार्फत विभागातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील सर्व शाळा व कनिष्ठ



महाविद्यालयांना तशा तात्काळ सूचना देण्यात याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास तातडीने सादर करावा, असं बोर्डाकडून सादर करण्यात आलेल्या परिपत्रकात मांडला आहे.

**दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांना दिलासा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची आज बैठक झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांचे दहावी-बारावी परीक्षा शुल्क घेऊन रिफंड करण्यापेक्षा आधीच घेऊ नका, अशी भूमिका मांडण्यात आली होती. मंत्रिमंडळात चर्चा झाल्यानंतर आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी न घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळं दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# मातंग समाजाचा महामोर्चा!

**वृत्तसंस्था, मुंबई**
मातंग समाजाकडून मंगळवारी मुंबईत अनुसूचित जाती (एससी) प्रवगार्तील उपवर्गीकरणावरून मोठे आंदोलन करण्यात आले आहे. अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची (अ, ब, क, ड) मागणी प्रलंबित राहिल्यामुळे राज्यभरातील मातंग समाज आक्रमक झाला आहे.आझाद मैदान परिसरात मातंग समाजाकडून आज आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र, आझाद मैदानाऐवजी मंत्रालय ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल हा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न आंदोलकांनी केला. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली.
पोलिसांनी तातडीने आंदोलकांची धरपकड सुरू केली. पोलिसांकडून बॅरिकेटिंग लावण्यात आले असून



परिसरात गोंधळ निर्माण झाला आहे. हा परिसर घोषणांनी दणाणून गेला आहे. पोलिसांचा मोठा बंदोबस्त या ठिकाणी लावण्यात आलेला आहे.
अनुसूचित जातीमधील आरक्षणचा फायदा या काही मोजक्या समाजाने घेतला यासंदर्भात सुप्रीम कोटार्ने निरीक्षण नोंदवून हे अनुसूचित जातीमधील आरक्षणच उपवर्गीकरण झाले पाहिजे असा निर्णय दिला आहे पण याची अंमलबजावणी ही राज्य सरकारकडून करण्यात येत नसल्यामुळे आम्हाला आज आंदोलन करावे लागत असल्याची प्रतिक्रिया विधान परिषदेचे भाजप आमदार अमित गोरखे यांनी दिली.
आम्हाला कोणाच्या ताटातील आरक्षण नको आहे. आम्हाला आमच्या हक्काचे आरक्षण हवे आहे आणि आमची लोकसंख्या किती तेवढं आरक्षण आम्हाला हवं आहे ही आमची साधी मागणी आहे आणि या मागणीला इतर समाज देखील पाठिंबा देतील. आज अनुसूचित जातीमधील सर्व समाज घटकांतील बांधव हे सजग झाले आहेत आणि ते आपल्या हक्कांसाठी लढत आहेत, असे गोरखे म्हणाले.

# बँकांनी वसुलीसाठी शेतकऱ्याकडे फिरकू नये!

**अधिकाऱ्यांनी मुख्यालयातच तळ ठोकावा, पाणी कपातीसह नवीन बांधकामांवर निर्बंधांचे संकेत, चारा व्यवस्थापनासाठी समिती, दुसऱ्या टप्प्यात ४३ तालुके दुष्काळी यादीत, सर्व्हेक्षण करून २५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल, शेतमजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी 'सीएसआर' फंड, दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश**

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी कर्जवसुलीसाठी जाता कामा नये," असे सक्त आदेश दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाला सर्वात प्राधान्य दिले असून यापुढे, संपूर्ण शासकीय यंत्रणा व विशेषतः तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात तळ ठोकून राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले.
बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना सूचना केली की, कर्जवसुली थांबविण्याबाबत परिपत्रक रिझर्व बँक काढेल का, याबाबत विचारणा करावी. तसेच,पतसंस्था, बँका यांनी पीक कर्जाच्या वसुलीबाबत शेतकऱ्यांच्या घराकडे जाता कामा नये. यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात याव्यात.
मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक आज (दि. २९) मंत्रालयात मुख्य सचिव यांच्या दालनात पार पडली. राज्यातील टंचाई परिस्थितीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. बैठकीस ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
मंत्री बावनकुळे म्हणाले, दुष्काळाच्या स्थितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत झाली पाहिजे. यासाठी प्रत्येक पंचनाम्यावर शेतकऱ्याची सही घेतली आहे. चाऱ्याची टंचाई, पाण्याची टंचाई आणि धरण तसेच तलावातील पाणीसाठी नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मोठ्या बांधकामांवर बंदी आणण्याबरोबरच सिमेंटचे रस्ते आणि पाण्याचा अपव्यय होईल अशी कामे टाळावी लागतील. जिल्हाधिकारी यांनी सीएसआर



फंडाचा जास्तीत जास्त उपयोग दुष्काळ निवारणाच्या कामासाठी करावा अशा सुचनाही त्यांनी केल्या.
प्रधान सचिव विनिता वेद सिंघल यांनी राज्याच्या दुष्काळी परिस्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, विभागीय आयुक्तांकडून प्राप्त माहितीनुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये टंचाईची परिस्थिती समोर आली आहे. 'ट्रिगर-१' च्या निकषानुसार दुष्काळ स्थिती स्पष्ट झाली असून, 'ट्रिगर-२' लागू होणाऱ्या ४३ तालुक्यांसह इतर सर्व प्रभावित क्षेत्रांसाठी कागदोपत्री विलंबाची वाट न पाहता शासनाचा निर्णय (ऋ्फ) तातडीने जारी करावा, अशा सूचना देण्यात आल्या. सध्या पेरणी ९६ टक्के झाली असली तरी जमिनीवर पिकांची खरी परिस्थिती चिंताजनक आहे. वस्तुस्थितीदर्शक सर्व्हेक्षण करून येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**पाणी कपात आणि नव्याने बांधकामांवर निर्बंध**

शहरी भागांत १० टक्के पाणीकपात लागू करून हे १० टक्के पाणी पुढील वर्षाच्या जून महिन्यासाठी 'बफर झोन' म्हणून सुरक्षित ठेवले जाईल. पिण्याचे पाणी आणि जनावरांचा चारा यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. गावतलाव व पाझरतलाव पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित राहतील. पाण्या वाटपाचा क्रम पिण्याचे पाणी, चारा पिके, रब्बी पिके (गहू इ.), आणि शेवटी ऊस पीक असा असावा अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या.
पर्यावरण व वातावरण बदलमंत्री पंकजा मुंडे यांनी पिण्याच्या पाण्याची अडचण असलेल्या भागात वैयक्तिक व व्यावसायिक बांधकामांच्या परवानगी तात्पुरत्या स्थगित करण्याची सूचना केली. तर तलावांच्या आजूबाजूला होणारी पाण्याची चोरी रोखण्यासाठी तेथील वीज कनेक्शन तोडण्याचे निर्देश गिरीष महाजन यांनी दिले.
राज्यात सध्या ५६० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. चारा छावण्यांची मागणी सध्या जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली नसली तरी पारंपरिक छावण्यांऐवजी 'चारा डेपो' सुरू करण्याचा पर्याय चांगला असल्याचे पंकजा मुंडे आणि बाबासाहेब पाटील, गुलाबराव पाटील यांनी स्पष्ट केले.
मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांनी राज्याचा चारा राज्याबाहेर जाणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी १० महिने पिण्याचे पाणी टिकवून ठेवण्याचे नियोजन मांडले. वाड्या-वस्त्यांवर लहान टँकर पाठवणे आणि स्थानिक पातळीवर अधिकाऱ्यांना टंचाई निधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिव जिल्ह्यातील गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत तेथे तत्काळ प्राधान्याने मदत पुरवण्याची मागणी केली.
सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी पीक नुकसानीचे पंचनामे योग्य पद्धतीनेच झाले पाहिजेत, यात कोणतीही गडबड चालणार नाही असा इशारा दिला. तसेच, शेतमजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी व त्यांच्या रोजगारासाठी जास्तीत जास्त 'सीएसआर' फंड उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले. एकंदरीत, रब्बी हंगामाची तयारी करतानाच आगामी १० महिन्यांच्या पाणी व चारा नियोजनासाठी प्रशासनाला पूर्ण क्षमतेने उतरण्याचे आदेश उपसमितीने दिले आहेत.

**चारा छावणी आणि पाण्याचे नियोजन समिती**

चारा छावणीचा प्रारंभिक प्रस्ताव हा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात यावा. त्यासाठी जिल्हा परिषद सीईओ, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांची समिती करुन तो अंतिम करण्यात यावा. तसेच सचिव स्तरावरही त्यावर नियंत्रण करण्यात येईल.तसेच, चाऱ्यावर देशातील अन्य राज्यांत करण्यात येणाऱ्या उपाययोजना तपासून महाराष्ट्रासाठी एक चांगली चारा योजना तयार करावी. यासाठी तीन विभागांच्या सचिवांची समिती मुख्य सचिवानी नेमावी असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# तब्बल ५६ लाखांचे नोटांचे बंडल, ३५५ ग्रॅम सोनं!

## लेडी ड्रग माफियाच्या घरातून सापडला खजिना



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
दिल्ली पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने, अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईत, महिला अंमली पदार्थ तस्कर पार्वतीच्या घरातून मोठ्या प्रमाणात रोकड आणि सोने जप्त केले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार बावाना येथील जे.जे. कॉलनीमधील तिच्या घराची आणि लॉकरची झडती घेतली असता, ५६ लाख ६९ हजार रुपयांची रोकड, ३५५ ग्रॅम सोन्याचे दागिने, १६१ ग्रॅम चांदीचे दागिने आणि मालमत्ता नोंदणीची चार कागदपत्रे सापडली. पोलिसांनी ही रक्कम अंमली पदार्थांच्या तस्करीतून मिळालेली कमाई आणि मालमत्ता असल्याचे म्हटले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार बावाना येथील न्यू सनोथ कॉलनीमधील एका घराच्या दुसऱ्या मजल्यावर छापा टाकण्यात आला होता.
महिला आरोपी, नियाजची पत्नी पार्वती आणि तिचा अंगरक्षक विकास उर्फ शानू यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ९३९ ग्रॅम हेरॉईन (स्मॅक), ६१५ ग्रॅम भेसळयुक्त पावडर आणि ७९३,१७० रोख रक्कम जप्त करण्यात आली.
पोलिसांच्या चौकशीत असे उघड झाले की, पार्वती बऱ्याच काळापासून बावाना आणि नरेला परिसरात अमली पदार्थांच्या पुरवठ्याच्या व्यवसायात गुंतलेली होती. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तिने अमली पदार्थांच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात पैसा, सोने आणि मालमत्ता जमा केली होती. तपासात असेही उघड झाले की, राजस्थानमधून अमली पदार्थांचा पुरवठा केला जात होता.

संपादकीय लेखणीतून...

# देशावरच दुष्काळ

यंदा संपूर्ण देशावरच दुष्काळाची छाया आहे. यंदाचा मान्सून देशाच्या शेती आणि पाणी व्यवस्थेसाठी मोठा आव्हान ठरला आहे. अल निनोच्या प्रभावामुळे २०२६ चा मान्सून गत १७ वर्षातील सर्वात कोरडा ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. यंदा सामान्यपेक्षा १५ टक्के कमी पाऊस नोंदवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) आकडेवारीनुसार २००९ नंतरचा हा सर्वात कमजोर मान्सून हंगाम असल्याचे संबंधित अहवालात नमूद करण्यात आले आहे. २००९ मध्ये पावसाची तूट १८.३ टक्के होती. १ जून ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत देशात सरासरी ८२७.२ मि. मी. पाऊस अपेक्षित होता मात्र प्रत्यक्षात केवळ ७०३.७ मि. मी. पावसाची नोंद झाली म्हणजे अपेक्षित पावसापेक्षा १२३.५ मि. मी. पाऊस कमी झाला. या तुटीचा परिणाम सध्याच्या खरीप पिकांवर तर झालाच; पण आता आगामी रब्बी हंगाम, पाणीसाठा आणि अन्नधान्याच्या किमतीबाबतही चिंता वाढली आहे. यंदाच्या मान्सूनच्या कमकुवत कामगिरीमागे प्रशांत महासागरातील अल निनोचा प्रभाव महत्त्वाचा असल्याचे हवामान तज्ज्ञांच्या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे. अल निनोच्या परिस्थितीमुळे समुद्राच्या पृष्ठभागाचं तापमान असामान्यरित्या वाढलं.

त्याचा परिणाम जागतिक वाऱ्यांच्या प्रणालीवर झाला आणि भारतीय उपखंडाकडे येणाऱ्या मान्सूनच्या वाऱ्यांची ताकद कमी झाली. यंदा पाऊस कमी झाला त्यामुळे त्याचं वितरणही अत्यंत असमतोल राहिले. जूनमध्ये मान्सूनची सुरुवातच निराशाजनक झाली. देशभरात सामान्यपेक्षा तब्बल ३५ टक्के पाऊस कमी झाला. जुलैच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या खोल दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला काही प्रमाणात चालना मिळाली त्यामुळे जुलै महिना तुलनेने समाधानकारक राहिला आणि शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला मात्र ऑगस्टमध्ये पावसाने पुन्हा ओढ दिली. या महिन्यात देशभरात १६ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली. सप्टेंबरमध्येही परिस्थितीत मोठी सुधारणा झाली नाही. देशातील अनेक भागात ५० टक्क्यांपर्यंत कमी पाऊस झाला. आता पश्चिम राजस्थान, पंजाब आणि हरियाणाच्या काही भागातून मान्सूनच्या माघारीची प्रक्रिया सुरू आहे त्यामुळे उर्वरित काळात एवढी मोठी पावसाची तूट भरून निघण्याची शक्यता कमी आहे.

देशाच्या अनेक भागात पावसाने पाठ फिरवल्याने उपखंडनिहाय आकडेवारीनुसार १४ पेक्षा अधिक राज्यांमध्ये पावसाची तूट २० ते ६० टक्क्यांच्या दरम्यान आहे. विशेषतः दक्षिण भारत, पूर्व भारत आणि ईशान्य भारतातील अनेक राज्यांना याचा मोठा फटका बसला आहे. भारतीय शेती मोठ्या प्रमाणात मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान पडणाऱ्या पावसाच्या आधारावर देशातील कोट्यवधी शेतकरी खरीप पिकांचे नियोजन करतात. यंदा पावसाच्या लहरीपणाचा परिणाम खरीप पिकांवर झाला आहे. धान, ऊस, मका आणि कापूस यासारख्या पिकांच्या पेरणीखालील क्षेत्रात मागील हंगामाच्या तुलनेत ३.७३ टक्क्यांची घट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. तांदूळ उत्पादनाबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कमकुवत मान्सूनमुळे यंदा देशाच्या तांदूळ उत्पादनात एक कोटी टनापर्यंत घट होऊ शकते. ऊस उत्पादनावरही पावसाच्या कमतरतेचा परिणाम झाल्यास पुढील काळात साखर उत्पादनावर त्याचे पडसाद उमटू शकतात. मान्सूनचा परिणाम फक्त शेतापर्यंत मर्यादित राहत नाही.

उत्पादन घटलं तर बाजारातील पुरवठ्यावर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम थेट अन्नधान्याच्या किमतीवर होऊ शकतो. ऑगस्टमध्ये देशातील खाद्य महागाई सलग सातव्या महिन्यात वाढून ५.९५ टक्क्यांवर पोहोचली. अर्थतज्ज्ञांच्या विश्लेषणानुसार, मान्सूनमधील प्रत्येक १ टक्का तुटीचा परिणाम खाद्य महागाईवर होऊ शकतो. आता चिंता केवळ खरीप पिकांपुरती राहिलेली नाही. आगामी रब्बी हंगामासाठी आवश्यक असलेल्या पाण्याबाबतही प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्रीय जल आयोगाच्या अखत्यारितील १५० हून अधिक प्रमुख जलाशयांमधील उपयुक्त जलसाठा मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३६ टक्क्यांनी कमी झाला आहे.



# डिजिटल युगात 'ती'चा पलटवार: सायबर भामट्याला तरुणीने शिकवला धडा!

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

आजच्या संगणकीय आणि आंतरजालाच्या युगात आर्थिक व्यवहार अत्यंत सोपे झाले असले तरी, त्यासोबतच सायबर फसवणुकीचे मोठे जाळेही सर्वत्र पसरले आहे. सामान्य माणसाच्या भीतीचा आणि अज्ञानाचा फायदा घेत त्याला लुटणाऱ्या भामट्यांच्या बातम्या आपण रोजच वाचतो. परंतु, नुकतीच समाजमाध्यमांवर एका अज्ञात तरुणीची एक ध्वनी-चित्रफीत वेगाने प्रसारित झाली, ज्यामध्ये तिने केवळ स्वतःची फसवणूकच टाळली नाही, तर अत्यंत चलाखीने त्या भामट्यालाच तब्बल अठरा हजार रुपयांचा गंडा घातला. ही घटना केवळ एका फसवणुकीचा उलटा डाव नसून, ती आधुनिक भारतातील एका सामान्य स्त्रीच्या अफाट आत्मविश्वासाची, तिच्या सजगतेची आणि डिजिटल साक्षरतेची एक अत्यंत बोलकी आणि प्रेरणादायी कथा आहे.

या घटनेची सुरुवात नेहमीच्याच फसवणुकीच्या मार्गाने झाली. एका अज्ञात व्यक्तीने या तरुणीशी संपर्क साधला आणि बँकेची ग्राहक पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्याच्या किंवा अर्धवेळ नोकरीच्या बहाण्याने तिला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. त्याने तिला एका विशिष्ट दुव्यावर जाऊन माहिती भरायला आणि काही रक्कम पाठवायला सांगितली. बहुतांश लोक अशा वेळी घाबरतात किंवा पैशांच्या लालचेला बळी पडतात. मात्र, या तरुणीने कमालीचे प्रसंगावधान राखले.

ही एक फसवणूक आहे हे ओळखूनही तिने फोन कट केला नाही, तर ती स्वतःच अज्ञानी असल्याचे नाटक करू लागली. भामट्याला संशय येऊ नये म्हणून तिने अत्यंत शांतपणे त्याच्या सूचना ऐकण्याचे सोंग केले आणि संभाषणाच्या ओघात त्यालाच गुंगवून ठेवले.

फसवणूक करणारा व्यक्ती जेव्हा आपल्याच जाळ्यात शिकार अडकत आहे या आनंदात होता, तेव्हा या तरुणीने डिजिटल व्यवहार प्रणालीतील 'पैशांची मागणी' करणाऱ्या पर्यायाचा अत्यंत हुशारीने वापर केला. तिने स्वतःच्या भ्रमणध्वनीवरून त्या भामट्याच्या क्रमांकावर अठरा हजार रुपयांच्या मागणीचा एक संदेश पाठवला. अत्यंत भोळेपणाचा आव आणत तिने त्याला सांगितले की, तिच्याकडून पैसे जात नाहीत, त्यामुळे त्यानेच त्या संदेशातील दुव्यावर जाऊन आपला गुप्त क्रमांक टाकावा, जेणेकरून प्रणाली पडताळणी पूर्ण होईल. समोरून मोठी रक्कम येणार या आशेने अंध झालेल्या त्या भामट्याने क्षणभराचाही विचार न करता स्वतःचा बँक खात्याचा गुप्त क्रमांक प्रविष्ट केला. आणि याच क्षणी फसवणूक करणाऱ्याच्याच खात्यातून अठरा हजार रुपये वजा झाले आणि ते थेट या तरुणीच्या खात्यात जमा झाले.

या संपूर्ण घटनेचा अभ्यास केल्यास अनेक पदर उलगडतात. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, कोणत्याही डिजिटल व्यवहारात पैसे 'मिळवण्यासाठी' कधीही गुप्त क्रमांकाची आवश्यकता नसते, तो क्रमांक केवळ पैसे 'देण्यासाठी' किंवा खात्यातील शिल्लक तपासण्यासाठीच लागतो. या एका साध्या, पण अत्यंत महत्त्वाच्या नियमाची पक्की जाण या तरुणीला होती. तिने भामट्यांच्याच हत्याराचा वापर त्यांच्याविरुद्ध केला. फसवणूक करणारे नेहमी माणसाच्या मानसिकतेशी खेळतात; ते एकतर भीती घालतात किंवा आमिष दाखवतात. या तरुणीने स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून भामट्याच्या मानसिकतेशी खेळण्याचा धाडसी प्रयोग केला आणि त्यात ती यशस्वीही झाली.

समाजमाध्यमांवर प्रसारित झालेल्या या घटनेतून मिळणारा संदेश अत्यंत कालसुसंगत आणि व्यापक आहे. ही घटना समाजातील दोन अत्यंत महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकते. पहिला पैलू म्हणजे सायबर साक्षरता, जी आजच्या काळात प्रत्येक नागरिकासाठी जगण्याची एक अत्यावश्यक कला बनली आहे. दुसरा आणि अधिक आश्वासक पैलू म्हणजे महिला सक्षमीकरण.

तंत्रज्ञान आणि अर्थव्यवहारात स्त्रिया आता केवळ मागे राहणाऱ्या किंवा सहज बळी पडणाऱ्या घटक राहिलेल्या नाहीत, तर त्या अत्यंत तल्लखपणे संकटांना सामोरे जाऊन समोरच्याला चारीमुंड्या चीत करू शकतात, हे या तरुणीने सिद्ध केले आहे. रडत बसण्यापेक्षा किंवा सायबर पोलिसांकडे तक्रार करत खेटे मारण्यापेक्षा, तिने दिलेला हा तत्काळ आणि थेट धडा फसवणूक करणाऱ्या टोळ्यांसाठी एक मोठी चपराक आहे. सजगता, अक्कलहुशारी आणि वेळेवर घेतलेला अचूक निर्णय, हेच डिजिटल जगातील सुरक्षेचे सर्वात मोठे कवच आहे, हे या घटनेने निर्विवादपणे अधोरेखित केले आहे.

एका अज्ञाताने दूरध्वनीवरून बँकेची पडताळणी करण्याचे आमिष दाखवून एका तरुणीची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा फसवा प्रकार असल्याचे ओळखूनही तरुणीने घाबरून न जाता भोळेपणाचे नाटक केले. तिने संभाषणात भामट्याला गुंगवून ठेवत, त्यालाच अठरा हजार रुपयांच्या 'पैशांच्या मागणी'चा संदेश पाठवला. 'माझ्याकडून पैसे जात नाहीत, तुम्हीच तुमचा गुप्त क्रमांक टाकून पडताळणी पूर्ण करा' असे तिने अत्यंत आत्मविश्वासाने सांगितले. पैशांच्या लालचेत अंध झालेल्या भामट्याने कोणतीही शहानिशा न करता स्वतःचा गुप्त क्रमांक टाकला. परिणामी, त्याच्याच खात्यातून अठरा हजार रुपये वजा होऊन ते थेट तरुणीच्या खात्यात जमा झाले. केवळ पैसे पाठवण्यासाठी गुप्त क्रमांक लागतो, पैसे मिळवण्यासाठी नाही, या साध्या नियमाचा हुशारीने वापर करून या तरुणीने भामट्यालाच सडेतोड धडा शिकवला. तिचे हे प्रसंगावधान आणि सजगता सर्वांसाठी एक उत्तम आदर्श आहे.

– ९५६१५९४३०६

# भारत-पाकिस्तान अंतिम सामना झाला व पावसाने वाहून गेला तर दोघांनाही सुवर्णपदक

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेटमध्ये २०२३ च्या नियमापेक्षा २०२६ मध्ये मोठा बदल; भारत-पाकिस्तानला संयुक्त सुवर्णपदकाची शक्यता

आशियाई क्रीडा स्पधेर्तील पुरुष क्रिकेटमध्ये सध्या पावसानेच सर्वाधिक चर्चा निर्माण केली आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी उपांत्यपूर्व फेरीचे सामने एकही चेंडू न खेळता पार केले आहेत. भारताला अफगाणिस्तान विरुद्ध, तर पाकिस्तानला हाँगकाँगविरुद्ध सामना खेळता आला नाही आणि दोन्ही संघांना त्यांच्या उच्च मानांकनाचा फायदा झाला.

**आता क्रिकेटप्रेमींच्या मनात एक मोठा प्रश्न आहे**

जर भारत आणि पाकिस्तानने आपापले उपांत्य सामने जिंकले आणि ३ ऑक्टोबरला सुवर्णपदकासाठी आमनेसामने आले, पण त्या अंतिम सामन्यातही पावसाने एकही चेंडू होऊ दिला नाही, तर सुवर्णपदक कोणाला मिळणार? याचे उत्तर यावेळी २०२३ पेक्षा वेगळे आहे.

उत्तर : दोघांनाही सुवर्णपदक!

२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी लागू करण्यात आलेल्या नियमांनुसार, अंतिम सामना पूर्णपणे पावसामुळे रद्द झाला आणि कोणताही निकाल लागला नाही, तर दोन्ही अंतिम फेरीतील संघांना संयुक्त सुवर्णपदक दिले जाईल. म्हणजे भारत आणि पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचले आणि अंतिम सामन्यात पावसामुळे निकाल लागला नाही, तर

भारत – सुवर्णपदक : पाकिस्तान – सुवर्णपदक अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होऊ शकते.हा नियम विशेष महत्त्वाचा आहे, कारण मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत अशीच परिस्थिती निर्माण झाली होती; मात्र त्यावेळी निकाल वेगळा लागला होता.

**२०२३ मध्ये काय झाले होते ?**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२३ मधील पुरुष क्रिकेटच्या अंतिम सामन्यात भारत आणि अफगाणिस्तान आमनेसामने होते. पावसामुळे सामन्यात पूर्ण खेळ होऊ शकला नाही. अफगाणिस्तानने १८.२ षटकांत ५ बाद ११२ धावा केल्या होत्या; त्यानंतर पावसामुळे भारतीय डाव सुरूच होऊ शकला नाही. त्या वेळच्या नियमांनुसार उच्च मानांकनाच्या संघाला प्राधान्य देण्यात आले आणि भारताला सुवर्णपदक, तर अफगाणिस्तानला रौप्यपदक मिळाले. म्हणजे २०२३ मध्ये अंतिम सामना रद्द, उच्च मानांकन, सुवर्णपदक एका संघाला असे समीकरण होते. पण २०२६ मध्ये अंतिम सामन्यासाठी परिस्थिती बदलली आहे.

**२०२६ मध्ये नवा नियम का महत्त्वाचा?**

२०२६ च्या स्पधेर्तील उपांत्यपूर्व आणि उपांत्य सामन्यांमध्ये सामना पावसामुळे रद्द झाल्यास उच्च मानांकनाचा नियम निर्णायक ठरतो. उदाहरणार्थ, भारताचे मानांकन अफगाणिस्तानपेक्षा वरचे असल्याने भारत पुढे गेला. पाकिस्तानचे मानांकन हाँगकाँगपेक्षा वरचे असल्याने पाकिस्तान पुढे गेला. परंतु अंतिम सामन्यासाठी वेगळा परिणाम ठेवण्यात आला आहे. अंतिम सामन्यात दोन्ही संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेले असल्यामुळे केवळ मानांकनाच्या आधारावर एका संघाला सुवर्ण आणि दुसऱ्याला रौप्य देण्याऐवजी, सामना पूर्णपणे पावसामुळे वाहून गेला तर दोन्ही संघांना सुवर्णपदक देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**भारत- पाकिस्तान अंतिम सामना : तीन शक्यता**

आता भारत आणि पाकिस्तानने उपांत्य सामने जिंकले, असे गृहीत धरू. ३ ऑक्टोबरला त्यांच्यात अंतिम सामना होतो. त्यावेळी तीन महत्त्वाच्या शक्यता तयार होतात.

१) सामना पूर्ण होतो

सामना नियोजित पद्धतीने झाला आणि निकाल लागला तर विजेता संघ सुवर्णपदक, तर पराभूत संघ रौप्यपदक मिळवेल. इथे पावसाचा प्रश्नच राहणार नाही.

२) पावसामुळे सामना काही प्रमाणात खेळला जातो आणि नियमांनुसार निकाल शक्य होतो.

सामना पूर्णपणे रद्द न होता आवश्यक किमान खेळ होतो आणि अधिकृत पद्धतीने निकाल निश्चित होऊ शकतो, तर त्या निकालानुसार सुवर्णपदकाचा निर्णय होईल. म्हणजे पाऊस आला म्हणून प्रत्येक वेळी दोन्ही संघांना सुवर्णपदक मिळेल असे नाही. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामना अधिकृत निकालापर्यंत पोहोचतो की नाही.

३) पावसामुळे अंतिम सामना पूर्णपणे रद्द होतो

ही सर्वात विलक्षण परिस्थिती असेल. जर भारत आणि पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचले आणि पावसामुळे अंतिम सामन्यात निकाल लागलाच नाही, तर २०२६ च्या नियमांनुसार–

भारत – सुवर्णपदक : पाकिस्तान – सुवर्णपदक

दोन्ही संघ संयुक्त सुवर्णपदक विजेते ठरू शकतात. म्हणजे मानांकन अंतिम सामन्यात काम करणार नाही. यातील बारकावा समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. उपांत्यपूर्व आणि उपांत्य सामन्यांत उच्च मानांकन महत्त्वाचे आहे; परंतु पूर्णपणे रद्द झालेल्या अंतिम सामन्यात त्याच पद्धतीने एका संघाला सुवर्ण देण्याची व्यवस्था नाही. यामुळे अंतिम सामन्यात भारत आणि पाकिस्तानसारखे दोन संघ आमनेसामने आले आणि सामना पावसामुळे पूर्णपणे रद्द झाला, तर मानांकनाच्या आधारावर भारताला किंवा पाकिस्तानला एकट्याला सुवर्ण देण्याऐवजी दोघांनाही संयुक्त सुवर्ण देण्याची शक्यता आहे. हीच २०२६ मधील सर्वात मोठी नियमात्मक वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे.

**२०२३ विरुद्ध २०२६ : नियमातील फरक**

परिस्थिती २०२३ २०२६

बाद फेरीतील सामना पावसामुळे रद्द, उच्च मानांकनाचा फायदा, अंतिम सामना पूर्णपणे रद्द दोन्ही अंतिम संघांना संयुक्त सुवर्ण

भारत-अफगाणिस्तान २०२३ भारत सुवर्ण, अफगाणिस्तान रौप्य, भारत-पाकिस्तान २०२६ अशी परिस्थिती आली तर दोघांनाही सुवर्णपदकाची शक्यता.

२०२३ मध्ये भारताला अफगाणिस्तानविरुद्धच्या पावसाने बाधित अंतिम सामन्यात उच्च मानांकनाचा फायदा झाला होता. २०२६ मध्ये मात्र अंतिम सामन्यासाठी संयुक्त सुवर्णाची नवी तरतूद चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

**क्रिकेटच्या इतिहासातील विलक्षण चित्र!**

१ ऑक्टोबरला भारत उपांत्य सामना जिंकतो. पाकिस्तानही आपला उपांत्य सामना जिंकतो. ३ ऑक्टोबरला भारत-पाकिस्तान अंतिम सामना निश्चित होतो. जगभरातील क्रिकेटप्रेमी अंतिम सामन्याची आतुरतेने वाट पाहतात. पण सामना सुरू होण्यापूर्वीच पाऊस! नाणेफेक नाही. खेळ नाही. फलंदाजी नाही. गोलंदाजी नाही. एकही धाव नाही. आणि तरीही काही तासांनंतर निकाल जाहीर होतो.

**भारत आणि पाकिस्तान संयुक्त सुवर्णपदक विजेते!**

क्रिकेटच्या मैदानावर असा प्रसंग घडला तर तो आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील अत्यंत अनोखा अध्याय ठरेल.

– ९०९६३७२०८२

# लोकनायक वीर भगतसिंग: शहीद-ए-आझम

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

भगतसिंग हे भारतीय क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. डिसेंबर १९२८ मध्ये त्यांनी आणि शिवराम, राजगुरू यांनी लाहोरमध्ये ब्रिटिश पोलिस अधिकारी जॉन सॉन्डर्स याची हत्या केली. ही हत्या लाला लजपत राय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी होती, ज्यांचा मृत्यू पोलिसांच्या लाठीहल्ल्यानंतर झाला होता. चुकून सॉन्डर्सला मारले गेले, कारण त्यांचा हेतू जेम्स स्कॉट नावाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मारण्याचा होता. सॉन्डर्सवर राजगुरूंनी गोळी झाडली आणि भगतसिंग यांनी जवळून आणखी गोळ्या मारल्या. चंद्रशेखर आझाद याने पाठलाग करणारा पोलिस चन्ननसिंग याला ठार केले. एप्रिल १९२९ मध्ये भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीच्या केंद्रीय विधानसभेत दोन छोटे बॉम्ब फेकले आणि स्वतःला अटक करून घेतली. तुरुंगात त्यांनी जतीन दास यांच्यासोबत उपोषण केले, मात्र दास यांच्या मृत्यूने ते संपले. मार्च १९३१ मध्ये वयाच्या २३व्या वर्षी, त्यांना फाशी देण्यात आली. त्यांच्या मृत्यूनंतर ते "लोकांचे नायक" बनले आणि "शहीद-ए-आझम" म्हणून ओळखले गेले.

भगत सिंग हे भारताचे एक महान आणि प्रख्यात क्रांतिकारक होते, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांचा जन्म दि.२८ (काही नोंदी प्रमाणे २७ सप्टेंबर) १९०७ रोजी पंजाबमधील ल्यालपूर जिल्ह्यातील (सध्या पाकिस्तानमध्ये) बंगा या गावात झाला. आई-वडीलः त्यांच्या आईचे नाव विद्यावती आणि वडिलांचे नाव किसनसिंग होते. कुटुंबः त्यांचे वडील आणि काका- सरदार अजितसिंग हे दोघेही स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय होते. त्यामुळे भगतसिंग यांना देशभक्तीचा वारसा घरातूनच मिळाला.

क्रांतिकारी कार्य-नवजवान भारत सभाः मार्च १९२६ मध्ये त्यांनी तरुणांमध्ये देशभक्ती जागवण्यासाठी 'नवजवान भारत सभा' स्थापन केली.हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनः ते या क्रांतिकारी संघटनेचे सक्रिय सदस्य बनले, ज्यामध्ये चंद्रशेखर आझाद यांच्यासारखे महान क्रांतिकारक होते.

सॉन्डर्स वधः लाला लजपत राय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भगतसिंग आणि शिवराम राजगुरू यांनी डिसेंबर १९२८ मध्ये लाहोर येथे ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉन्डर्स याला ठार केले.

मध्यवर्ती विधिमंडळ स्फोटः ८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी ब्रिटिश संसदेत (सेंट्रल असेंबली) कोणत्याही जीवीत हानी पोहोचवता केवळ बहिऱ्या सरकारला जागी करण्यासाठी सौम्य बॉम्ब फेकला आणि "इंकलाब जिंदाबाद" च्या घोषणा देत स्वतःला अटक करून घेतली. फाशीः दि.२३ मार्च १९३१ रोजी संध्याकाळी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना लाहोर तुरुंगात फाशी देण्यात आली. त्यांनी हसत-हसत देशासाठी मृत्यू पत्करला. त्यांच्या याच बलिदानामुळे त्यांना 'हुतात्मा' म्हणून ओळखले जाते.

भगतसिंग यांना हिंदी, उर्दू,पंजाबी,आणि इंग्रजी भाषेच्या व्यतिरिक्त बंगला देखील येत होती. वयाच्या १४ व्या वर्षीच ते गुरुद्वारात नानकासाहेब येथे अनेक लोकांना ठार मारण्याच्या विरोधातच्या आंदोलनात सहभागी झाले. नंतर ते युवा क्रांतिकारी चळवळीत सामील झाले, आणि ब्रिटिश सरकारच्या हिंसक मार्गाने पाडाव करण्याच्या विचाराचे समर्थक झाले. इटलीच्या एका गटापासून प्रेरित होऊन भगतसिंगने मार्च १९२६ मध्ये 'नवजवान भारत सभा' स्थापन केली. नंतर ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक संघाचे सदस्य देखील झाले. या संघात त्यांच्या सह चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, शाहिद, अशफाखाल्ला खान सारखे दिग्गज होते. डिसेंबर १९२८ मध्ये, भगतसिंग आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरू यांनी ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉडर्स ला लाहोर येथे गोळ्या घालून ठार केले. ब्रिटिश पोलीस अधीक्षक जेम्स कॉटच्या आदेशावरून लाला लाजपतराय यांच्या वर लाठीचार्ज करून जबर जखमी केले. त्यामुळे लाला लाजपतराय यांना आपले प्राण गमवावे लागले.

लाला लाजपत राय ह्यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांनी जेम्स कॉटला ठार मारायचे ठरविले होते परंतु एन वेळी सॉडर्स पुढे आल्यामुळे तो ठार झाला. या नंतर त्यांनी देशाला ब्रिटिशांच्या तावडीतून स्वातंत्र्य करण्यासाठी साहसाने ब्रिटिश सरकारचा सामना केला त्यांनी दिल्लीच्या सेंट्रल असेंब्ली मध्ये बॉम्ब हल्ला करून ब्रिटिश साम्राज्याच्या विरुद्ध उघड बंड केले. त्यांनी सेंट्रल असेंब्ली मध्ये बॉम्ब टाकून पळून जाण्याचा प्रयत्न देखील केला नाही. त्यासाठी त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांपैकी दोन सहकारी राजगुरू आणि सुखदेव यांना अचानक दि. २३ मार्च १९३१ रोजी फासावर लटकविण्यात आले. त्यावेळी त्यांचे वय अवघे २३ वर्षाचे होते. त्यांच्या त्यागाला संपूर्ण देश आजतायगत स्मरत आहे.

निर्धारित दि. २४ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना लाहोर सेंट्रल जेलमध्ये फाशी देण्यात येणार होती. या निर्णयावर भगतसिंग खूश नव्हते. त्यांनी दि. २० मार्च १९३१ रोजी पंजाबच्या राज्यपालांना पत्र लिहिले, "त्यांना युद्धकैद्याप्रमाणे वागणूक द्यावी आणि त्यांना फाशी देण्याऐवजी गोळ्या घातल्या जाव्यात." दि. २२ मार्च १९३१ रोजी आपल्या क्रांतिकारक सहकाऱ्यांसोबत लिहिलेल्या शेवटच्या पत्रात भगतसिंग म्हणाले होते, 'मलाही जगण्याची इच्छा आहे, मला हे लपवायचे नाही. पण फाशीच्या शिक्षेपासून सुटण्याची हाव माझ्या मनात कधीच आली नाही. मी अंतिम परीक्षेची वाट पाहत आहे.' भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना दि. २३ मार्च १०३१ रोजी संध्याकाळी ७.३३ वाजता, फाशीच्या निर्धारित वेळेच्या १२ तास आधी फाशी देण्यात आली. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी! शहीद भगतसिंग यांना पावन जयंती सप्ताह निमित्त त्यांना व त्यांच्या अचाट देशभक्तीला विनम्र अभिवादन जी !

– ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ई-पिक पाहणीचा घोळ!

## चुकीच्या नकाशामुळे शेतकरी अडचणीत

### सोयाबीन कापणी तोंडावर, नकाशा दुरुस्त न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर जिल्ह्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री यांच्या गृह जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातच ई-पिक पाहणीच्या प्रक्रियेला चुकीच्या नकाशाचा फटका बसत असल्याची माहिती समोर आली आहे. मेंढला परिसरातील शेतजमिनींच्या नकाशामध्ये तफावत असल्यामुळे प्रत्यक्ष शेतात पीक असूनही ई-पिक पाहणीची नोंद करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोयाबीन पिकाची कापणी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर ई-पिक पाहणीची नोंद झालेली नसल्याने भविष्यात पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेताना अडचणी निर्माण होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे ई-पिक पाहणीची नोंद वेळेत आणि अचूक होणे गरजेचे असताना नकाशातील त्रुटी शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे.

ई-पिक पाहणी करण्यासाठी शेतात गेलेल्या काही शेतकऱ्यांना आपल्या शेताचा नकाशा दुसऱ्याच शेतात दाखवत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रत्यक्ष शेतात एका पिकाची लागवड असताना नकाशानुसार दुसऱ्याच शेतात गेल्यास वेगळे पीक दिसत असल्याने पीक नोंदणीमध्ये तफावत निर्माण होत आहे. त्यामुळे चुकीची पीक नोंद झाल्यास त्याचा परिणाम संबंधित शेतकऱ्यांच्या नोंदीवर होण्याची शक्यता आहे.

नकाशातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी मेंढला परिसरातील शेतकरी तलाठी कार्यालयासह संबंधित महसूल व भूमिअभिलेख कार्यालयाच्या चकरा मारत आहेत. साहेब, मेंढला परिसरातील गावाचा नकाशा दुरुस्त झाला का? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. नकाशा दुरुस्तीअभावी ई-पिक पाहणीची प्रक्रिया रखडल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

मेंढला परिसरातील शेतकऱ्यांनी नकाशातील त्रुटीची बाब महसूल व भूमिअभिलेख विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे. नकाशा दुरुस्तीबाबत पुणे कार्यालय, जिल्हाधिकारी नागपूर, उपविभागीय अधिकारी काटोल, तहसीलदार नरखेड तसेच भूमिअभिलेख कार्यालय नरखेड येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सोयाबीन कापणीचा हंगाम जवळ आल्याने महसूल व भूमिअभिलेख विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन नकाशातील त्रुटी दूर करावी. तसेच मेंढला परिसरातील शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर त्यांच्या प्रत्यक्ष पिकाची अचूक नोंद होण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी वगार्तून होत आहे.

दरम्यान, या प्रकरणात प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दूधाने यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या पिकाची नोंद चुकीच्या नकाशामुळे बाधित होऊ नये, यासाठी महसूल व भूमिअभिलेख विभागाने तातडीने संयुक्तपणे कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**नकाशातील त्रुटी गंभीर, अन्यथा आंदोलन**

मेंढला परिसरातील ई-पिक पाहणीच्या नकाशातील त्रुटीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सोयाबीन कापणी तोंडावर आली असताना सातबाऱ्यावर प्रत्यक्ष पिकाची अचूक नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. चुकीच्या नकाशामुळे पीक नोंदणीमध्ये तफावत निर्माण झाल्यास भविष्यात पीक विमा व नुकसानभरपाईपासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तातडीने नकाशाची दुरुस्ती करून सर्व शेतकऱ्यांच्या पीक नोंदी अचूक कराव्यात. अन्यथा शेतकऱ्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**– सागर दूधाने, जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना**

**नकाशा दुरुस्तीची तक्रार दाखल केली आहे**

शेतीचा चुकीचा नकाशा दुरुस्त करण्याबाबत पुणे कार्यालय, जिल्हाधिकारी नागपूर, उपविभागीय अधिकारी काटोल, तहसीलदार नरखेड तसेच भूमिअभिलेख कार्यालय नरखेड येथे संबंधित तक्रार दाखल केली आहे. नकाशातील त्रुटीची दुरुस्ती लवकरच होईल, असे संबंधित कार्यालयांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी चिंता करू नये.

**– वैभव मोटघरे, तलाठी, मेंढला**

**ई-पिक पाहणी करताना अडचण**

मी शेतात ई-पिक पाहणी करण्यासाठी गेलो असता माज्या शेताचा नकाशा दुसऱ्याच शेतात दाखवत असल्याचे दिसून आले. माज्या शेतात कपाशी पिकाची लागवड केली आहे. मात्र, नकाशानुसार दुसऱ्याच शेतात गेल्यावर तेथे सोयाबीन पीक दिसत आहे. त्यामुळे ई-पिक पाहणी करताना अडचण निर्माण होत आहे. शासनाने या विषयाकडे लक्ष देऊन लवकरात लवकर शेतीचा नकाशा दुरुस्त करावा.

**– सुधाकर सातपुते (महाजन), शेतकरी, मेंढला**

## डॉ. विशाल रामटेके यांनी नेफ्रोलॉजी सोसायटी, नागपूरच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली, डॉ. जितेश जेसवानी सचिवपदी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नेफ्रोलॉजी सोसायटीचा पदग्रहण समारंभ हॉटेल सेंटर पॉइंट, नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात वर्ष २०२६ साठी नव्या कार्यकारिणीने अधिकृतपणे आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या. डॉ. विशाल रामटेके यांनी वर्ष २०२६ साठी नेफ्रोलॉजी सोसायटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली, तर डॉ. जितेश जेसवानी यांनी सचिवपदाची धुरा स्वीकारली. त्यांनी मावळते अध्यक्ष डॉ. पीयूष किम्मतकर आणि सचिव डॉ. अमोल भावणे यांच्याकडून औपचारिकरित्या पदभार स्वीकारला. या पदग्रहण समारंभाला मुंबई येथील जसलोक हॉस्पिटलचे प्रसिद्ध नेफ्रोलॉजिस्ट डॉ. एम. एम. बहादूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. बहादूर यांनी "Beyond Guidelines - On UnknownTurf" या विषयावर मार्गदर्शक आणि अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी आधुनिक नेफ्रोलॉजी क्षेत्रातील बदलती आव्हाने आणि विकसित होत असलेल्या उपचारपद्धती व दृष्टिकोनांवर प्रकाश टाकला. थॅलेसेमिया अँड सिकल सेल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. विंकी रुंगवानी हे या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

नवनियुक्त कार्यकारिणीत अध्यक्ष डॉ. विशाल रामटेके, सचिव डॉ. जितेश जेसवानी, उपाध्यक्ष डॉ. उत्कर्ष देशमुख, डॉ. अमोल भावणे, खजिनदार डॉ. मनोज धनोरकर, सहसचिव डॉ. आनंद चेल्लप्पन, तर कार्यकारिणी सदस्य डॉ. वृशाली देशपांडे, डॉ. राधेश्याम पाचे, डॉ. रोहित बैज, या समारंभास शहरातील नेफ्रोलॉजिस्ट तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मावळत्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेण्यात आली आणि नव्या कार्यकारिणीचे स्वागत करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी नेफ्रोलॉजी सोसायटी अधिक सक्षम करण्यासाठी, शैक्षणिक उपक्रमांना चालना देण्यासाठी, व्यावसायिक सहकार्य वाढविण्यासाठी तसेच मूत्रपिंडांच्या आरोग्याबाबत जनजागृती आणि आरोग्यसेवेत योगदान देण्यासाठी आपली बांधिलकी व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप नव्या कार्यकारिणीच्या यशस्वी आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध कार्यकाळासाठी शुभेच्छा देऊन करण्यात आला.



## अजिंक्य वखरे यांना 'जीरो माइल आयकॉन-२०२६ स्वास्थ रत्न' पुरस्काराने सन्मानित

### सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर अजिंक्य वखरे यांना 'जीरो माइल आयकॉन-२०२६ स्वास्थ रत्न' पुरस्कार, सिनर्जी फिटनेसच्या माध्यमातून फिटनेस क्षेत्रात उल्लेखनीय योगदान



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उद्योजकता, सामाजिक बांधिलकी, शासकीय जनजागृती, ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन तसेच सांस्कृतिक आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने आयोजित 'जीरो माइल आयकॉन अवॉर्ड-२०२६' सोहळ्यात सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर व सिनर्जी फिटनेसचे संस्थापक अजिंक्य वखरे यांना प्रतिष्ठेच्या 'स्वास्थ (फिटनेस) रत्न पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

जीरो माइल राष्ट्रीय हिंदी साप्ताहिक अखबार व जीरो माइल फाउंडेशन, नागपूर यांच्या २१व्या वर्धापन दिनानिमित्त हॉटेल तुली इम्पेरियल येथे 'जीरो माइल आयकॉन अवॉर्ड-२०२६' तसेच विशेषांक विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. याच प्रसंगी फिटनेस क्षेत्रातील योगदानाची दखल घेत अजिंक्य वखरे यांना स्वास्थ रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीरामनारायण मिश्र आणि आनंद शर्मा यांच्या हस्ते अजिंक्य वखरे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सिनर्जी फिटनेसच्या माध्यमातून व्यायाम, शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती करण्यासाठी तसेच फिटनेस क्षेत्राला व्यावसायिक आणि आधुनिक दृष्टिकोन देण्यासाठी वखरे यांचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल अजिंक्य वखरे यांनी आयोजकांचे आभार मानत फिटनेस हा केवळ शरीरयष्टी घडविण्याचा विषय नसून, निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाने नियमित व्यायाम, योग्य आहार आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा स्वीकार करावा, यासाठी भविष्यातही कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी रामनारायण मिश्र, सुनील दत्त शर्मा, रवि बोराटकर, डॉ. निलेश अग्रवाल, आचार्य पं.सुधीर शास्त्री, सुदर्शन चक्रधर, डॉ.महेंद्र सेठ, विकास मिश्रा, डॉ. प्रवीण डबली, डॉ. संजीवनी चौधरी, चंदू गलगलीकर, आशीष खरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन जीरो माइलचे मुख्य संपादक डॉ. आनंद शर्मा यांनी केले. यावेळी कार्यकारी संपादक विद्या शर्मा तसेच ज्येष्ठ लेखापाल मोहम्मद सलीम यांचीही उपस्थिती होती.

जीरो माइल राष्ट्रीय हिंदी साप्ताहिकाने आपल्या २१व्या वर्षात पदार्पण करताना आयोजित केलेल्या या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. पुरस्कार वितरण, विशेषांक विमोचन आणि मान्यवरांचा गौरव अशा विविध उपक्रमांनी सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या कार्यक्रमात अजिंक्य वखरे यांना मिळालेला स्वास्थ रत्न पुरस्कार त्यांच्या फिटनेस क्षेत्रातील कार्याचा गौरव करणारा ठरला.

## पाच वर्षीय अरहंत थुलचा आणखी एक विश्वविक्रम, देशाचा गौरव वाढवला

### अवघ्या ३ मिनिटे ५४ सेकंदांत दोन अंकी बेरीज-वजाबाकीचे ५५ प्रश्न सोडवून उल्लेखनीय कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अवघ्या पाचव्या वर्षी आपल्या विलक्षण गणिती कौशल्याची झलक दाखवत नागपूरच्या अरहंत नितेश थुल याने आणखी एका विश्वविक्रमाची नोंद केली आहे. अरहंतने अवघ्या ३ मिनिटे ५४ सेकंदांत दोन अंकी बेरीज आणि वजाबाकीचे तब्बल ५५ प्रश्न अचूकपणे सोडवून उल्लेखनीय कामगिरी केली. या कामगिरीची २५ ऑगस्ट २०२६ रोजी Nobel World Records द्वारे विश्वविक्रम म्हणून नोंद करण्यात आली.

अरहंतचा हा चौथा विश्वविक्रम असल्याने त्याच्या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एवढ्या लहान वयात गणितासारख्या विषयातील गुंतागुंतीची उदाहरणे अत्यंत वेगाने आणि अचूकपणे सोडविण्याची त्याची क्षमता कौतुकास्पद ठरत आहे. त्याच्या या कामगिरीमुळे नागपूरसह महाराष्ट्र आणि देशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.




अरहंतच्या या यशामागे त्याची आईची मेहनत, सातत्यपूर्ण मार्गदर्शन, नियमित सराव आणि प्रोत्साहन यांचा मोठा वाटा आहे. अरहंतच्या गणिती क्षमतेला योग्य दिशा मिळावी यासाठी त्याच्या आईने नियमितपणे त्याच्यासोबत सराव केला. दररोजच्या सरावातून त्याचा वेग, अचूकता आणि आत्मविश्वास वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला.

आव्हानात्मक प्रश्नही शांतपणे आणि एकाग्रतेने सोडविण्याची सवय त्याला लागली. दोन अंकी संख्यांची बेरीज व वजाबाकी अवघ्या काही मिनिटांत पूर्ण करण्यासाठी वेगवान गणिती गणना, एकाग्रता आणि अचूकता आवश्यक असते. अरहंतने या तिन्ही बाबींमध्ये सातत्यपूर्ण प्रगती साधत ही विक्रमी कामगिरी केली. त्याच्या या यशातून लहान वयातच योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि प्रोत्साहन मिळाल्यास मुलांच्या सुप्त गुणांना कशी दिशा मिळू शकते, हे अधोरेखित होते.

अरहंतच्या या विक्रमामुळे त्याचे कुटुंबीय, मार्गदर्शक आणि नागपूरकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही तो आपल्या गणिती प्रतिभेच्या जोरावर आणखी उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चौथा विश्वविक्रम नोंदविणाऱ्या अरहंतने आपल्या मेहनतीने आणि गणितावरील आवडीने अत्यंत कमी वयात देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.

**थोडक्यात**

## सेवापूर्तीच्या निमित्ताने ज्योती मनकवडे यांचा भावपूर्ण सत्कार

### पंचधार येथील जि. प. प्राथमिक शाळेत उत्साहात सोहळा; सभापती संजय डांगोरे यांनी केला शैक्षणिक सेवाकार्याचा गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पंचधार येथे ज्योती उत्तमराव मनकवडे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला सत्कार सोहळा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचधारचे सरपंच श्री. जगदिश ढेंगरे आणि प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सभापती समाजसेवक संजयजी डांगोरे उपस्थित होते. यावेळी उपसरपंच सागर बोटरे, शिक्षण विस्तार अधिकारी संजयजी चिखले, केंद्रप्रमुख महेशकुमार राकेश, काळे साहेब, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन धांडे, माजी गटशिक्षणाधिकारी नरेशजी भोयर सर तसेच केंद्रप्रमुख रमेशजी गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या मनोगतात ज्योती मनकवडे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला उजाळा देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या योगदानाचे कौतुक केले. शिक्षक म्हणून प्रामाणिकपणे व समर्पित भावनेने केलेली सेवा ही भावी पिढी घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सभापती संजयजी डांगोरे यांनी नमूद केले.

सेवापूर्ती सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्र कचारीसावंगा अंतर्गत येणाऱ्या सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षक, पालक, ग्रामस्थ व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संजय कडु तर आभार प्रदर्शन राजुजी बगवे यांनी केले. उपस्थितांच्या सदिच्छा व शुभेच्छांनी सेवापूर्ती सोहळा संस्मरणीय ठरला.

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनामा करिता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे धरणे आंदोलन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याकरिता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाने व्हेरायटी चौक येथे धरणे आंदोलन केले तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी आंदोलन पवित्रा घेतल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी कार्यकर्त्यांना अटक केली. यावेळी प्रामुख्याने ग्रामीण जिल्हाध्यक्ष सलील देशमुख, शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक दुनेश्वर पेठे, महिला शहर अध्यक्ष प्रिया फुके, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश अध्यक्ष अफजल फारूक, उत्तर नागपूरचे महेंद्र भांगे, प्रदेश महासचिव अविनाश गोतमारे, शहर उपाध्यक्ष सुरेश जिचकार, सामाजिक कार्यकर्ते पुरुषोत्तम मुरमे, एकनाथ काळमेघ, रियाज शेख, सारिका ताटे, रुद्र धाकडे व मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

## आयपीएस कुमार सुशांत यांच्या धडक कारवाईत दोन रेती हायवा जप्त : ५१ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे )**

अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या दोन हायवांवर सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत यांनी पहाटे धडक कारवाई केली. जुनोना परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत दोन हायवा व त्यातील रेती असा एकूण ५१ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. मंगळवारी पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत हे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व बल्लारपूर पोलीस ठाण्याच्या पथकासह बल्लारपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी पोंभुर्णा मार्गाने येणाऱ्या दोन हायवांवर संशय आल्याने जुनोना परिसरात त्यांची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान एमएच ३४ सीक्यू ९९९६ आणि एमएच ३६ एए ८७०० क्रमांकाच्या दोन्ही हायवांमध्ये रेती भरलेली आढळून आली. सदर रेतीची वाहतूक अवैध पद्धतीने केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कुमार सुशांत यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दोन्ही हायवा ताब्यात घेतले. या कारवाईत हायवा चालक सुमित संतोष टेंभुर्णे (४२), रा. अष्टभुजा वॉर्ड, चंद्रपूर आणि नितीन मनराज कातकर (३९), रा. घोडपेट सायवन, ता. भद्रावती यांना ताब्यात घेण्यात आले. वाहनांसह रेती असा एकूण ५१ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पहाटेच्या वेळी पोंभुर्णा मार्गावर सुरू असलेली अवैध रेती वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या कचाट्यात सापडल्याने रेती तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. जप्त केलेल्या रेतीचा स्त्रोत, वाहतुकीचा मार्ग आणि या प्रकरणाशी संबंधित इतर बाबींचा तपास सुरू आहे.

थोडक्यात

## देवग्राम येथे 'एक पेड माँ बाप के नाम' अभियानांतर्गत वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच आमदार चरणसिंगजी ठाकूर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'एक पेड माँ बाप के नाम' या अभियानांतर्गत देवग्राम येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून संपूर्ण गावात वृक्षलागवडीची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे नागपूर जिल्हा ग्रामीण महामंत्री प्रवीणजी लोहे, शक्तिकेंद्र प्रमुख नितीनजी वासाडे, माजी पोलीस कॉन्स्टेबल सुधाकरराव लोहे, बूथ प्रमुख राजू ठोंबरे, जीवनजी दंढारे, विजय तळहांडे, भैय्याभाऊ मेंढे, बंडूजी दंढारे, हरिरामजी वासाडे, संजय वासाडे, मुकेश कांबळे, गजाननराव लोहे, दिगांबरजी लोहे, रविंद्रजी तायवाडे, राजू नागमोते, सुनील राऊत, शंकर वंगळ, गणेश लोहे, सागर लोहे, गणेश मेंढे, राजेंद्र दिवाने, विजय वासाडे, रोहित लोहे, नरेशजी सोनोने, साहेबराव सोनोने, पोस्टमन राखी चौधरी, प्रमोद राऊत, दिवाकर कुंभारे, अनुराग वासाडे, रितेश लोहे यांच्यासह अनेक देवग्रामवासी उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व आणि भावी पिढीसाठी हरित परिसर निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या प्रत्येक रोपट्याचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला. 'एक पेड माँ बाप के नाम' या उपक्रमातून आपल्या आई-वडिलांच्या स्मृतीला वृक्षाच्या रूपाने जपतानाच निसर्ग संवर्धनाला हातभार लावण्याचा प्रेरणादायी संदेश देवग्रामवासीयांनी दिला.

## धान पिकांवरील रोगराईमुळे शेतकरी संकटात

### तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

बदलत्या हवामानामुळे सालेकसा तालुक्यातील धान पिकांवर विविध रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढला असून धान उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुका सालेकसाच्या वतीने २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या नावाने तहसीलदार सालेकसा नरसय्या कोंडागुरले यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. सालेकसा तालुक्यात धान हे प्रमुख पीक असून मोठ्या प्रमाणात शेतकरी धानाची लागवड करतात. मात्र, सध्या बदललेल्या हवामानाचा विपरीत परिणाम धान पिकावर होत असून करपा, खोडकिडा, माहू, तुडतुडा तसेच इतर रोग व किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. पिकाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी वारंवार महागड्या औषधांची फवारणी करीत आहेत. मात्र, अपेक्षित परिणाम होत नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत असून त्यांच्यावर आर्थिक भार पडत आहे.

रोगराईमुळे आगामी काळात धानाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत पीक विमा काढलेल्या सर्व शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून विमा कंपनीला आवश्यक कार्यवाहीचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच, ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला नाही, अशा शेतकऱ्यांनाही शासनाकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाकडे तातडीने अहवाल सादर करावा. कृषी विभागाच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी करून योग्य पंचनामे करावेत आणि नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली. सालेकसा तालुक्यातील संकटग्रस्त धान उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने ठोस व प्रभावी पाठपुरावा करावा, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे, सालेकसा शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, रिषी बैस, ताराचंद गराडे, लेखराम लिल्हारे, रविंद्र पंधरे यांच्यासह इतर शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते.

## नायलॉन मांजाला कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी नियमावली तयार होणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर व अमरावती विभागात नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक, वाहतूक आणि वापरावर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय आणि महापालिकेच्या पातळीवर नियमावली तयार करण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत. या संदर्भात स्वतंत्र नियमावली तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असून नायलॉन मांजाचा वापर बंद व्हावा यासाठी न्यायालयाने १२ जानेवारी २०२६ रोजी दंडाबाबतचे आदेश पारित केले होते. त्यानुसार नायलॉन मांजा वापरून पतंग उडवताना आढळल्यास संबंधितास २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येईल. पतंग उडवणारी व्यक्ती अल्पवयीन असल्यास हा दंड थेट तिच्या पालकांकडून वसूल केला जाईल.

# अभिजित वंजारी ५ ऑक्टोबरला करणार उमेदवारी अर्ज दाखल?

### नागपूर पदवीधर निवडणूक : भाजपात उमेदवारावर मंथन, कोहळे-सोले की तिसरा?






**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

काँग्रेसकडून उमेदवारी निश्चित असल्याने नागपूर पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी काँग्रेस नेते अभिजित वंजारी यांनी आपला जोरदार प्रचार सुरु केला आहे. देशात नुकतेच झालेले कॉक्रोज जनता पक्षाचे आंदोलन आणि ज्ञानेश कुमार यांचे प्रकरण याचा या निवडणुकीत मोठा प्रभाव राहणार असून यात काँग्रेसचाच विजय होईल, असा दावा त्यांनी केला आहे. सरकारची ही लिटमस टेस्ट असून राज्यातील जनता ही कोणाच्या बाजूने आहे, हे या निवडणुकीतून स्पष्ट होईल, असेही अभिजित वंजारी यांनी ठामपणे सांगितले.

अभिजित वंजारी येत्या ५ ऑक्टोबरला आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या वेळी त्यांच्यासोबत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी सिरिवेल्ला प्रसाद व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे प्रमुख नेते उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. काँग्रेसने आपले पत्ते उघड केले असले तरी, भाजपने अद्याप आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे काँग्रेसच्या अभिजित वंजारी यांच्या विरोधात भाजपकडून कोणाला निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं जातं, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सध्या भाजपमध्ये उमेदवारी मिळवण्यावरून मोठी चुरस रंगली आहे. हा मतदारसंघ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा गृहजिल्हा असल्याने भाजपसाठी अत्यंत प्रतिष्ठेचा आहे. त्यामुळे या दिग्गज नेत्यांच्या गृहजिल्ह्यात भाजपचा विजय कोण खेचून आणणार आणि पक्ष नेमका कोणावर आपला डाव आजमावणार, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे.

**बावनकुळेंचे कोहळेंबद्दलचे 'ते' वक्तव्य वायरल!**

नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पदवीधर निवडणुकीच्या मतदार मोहिमेचा जो प्रमुख असतो 'तो' भविष्यात त्या निवडणुकीत काय असतो? हे सर्वांना माहिती आहे अशा प्रश्नात उत्तर सुधाकर कोहळेंबाबत एका कार्यक्रमात दिले होते. आता तो व्हिडीओ मोठ्या प्रमाणात वायरल होत आहे. त्यामुळे उमेदवारीसाठी सुधाकर कोहळेच दावेदार असल्याचे भाजप वर्तुळात बोलले जात आहे.

**सुधाकर कोहळे, अनिल सोले प्रमुख दावेदार!**

नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी भाजपने आपला अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नसला तरी, संभाव्य उमेदवार म्हणून सुधाकर कोहळे आणि अनिल सोले यांनी आपला प्रचार सुरु केला आहे. उमेदवारी कोणाला पण मिळो, भाजपच्या उमेदवाराला जिंकून आणायचे आहे. यासाठी आमची तयारी सुरु झाली असून आम्ही देखील प्रचाराला सुरवात केली आहे, असे कोहळे, सोले यांनी सांगितले.

**ॲड. रमण सेनाड यांची उमेदवारीची मागणी**

एकीकडे नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात भाजपाची डोकेदुखी वाढली असून संघ परिवारातील इच्छुकांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली आहे. विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर आयामचे विदर्भसह प्रांतप्रमुख ॲड. रमण सेनाड यांनी आपल्याला उमेदवारी मिळावी, अशी मागणी केली आहे. मी मागच्या पन्नास वर्षांपासून संघ परिवाराचे काम करतो, तीस वर्षांपासून भाजपमध्ये काम करत आहे. अनेक वेळा मी उमेदवारी मागितली, मात्र पक्षाने तिकीट नाकारली. तरी प्रामाणिकपणे पक्ष व संघाचे काम सुरु ठेवले. मुख्यमंत्री माझ्याबद्दल सकारात्मक असून यावेळेस मला उमेदवारी भेटेल, असा विश्वास ॲड. रमण सेनाड यांनी व्यक्त केला आहे.

## वैनगंगा अभियांत्रिकी महाविद्यालयात सायबर जनजागृती कार्यशाळा, ६०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नागपूर येथे 'सायबर हायजीन आणि सायबर एथिक्स' या विषयावर सायबर जनजागृती कार्यशाळेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. एडुसन फाउंडेशनच्या वतीने आणि सायबर सेल, नागपूर पोलिस यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यशाळेस नागपूर पोलिसांच्या सायबर सेलच्या आचल चित्तारी आणि एडुसन फाउंडेशनचे संचालक निलेश एच. काळे यांनी मार्गदर्शन केले.

आचल चित्तारी यांनी विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीच्या पद्धती, सायबर गुन्हे आणि त्यांचे कायदेशीर परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. APK फाइल्स, गेमिंग फ्रॉड, सोशल मीडिया स्कॅम तसेच इतर डिजिटल धोक्यांपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यासोबतच अँड्रॉइड मोबाईलमधील महत्त्वाच्या सुरक्षा सेटिंग्ज आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा सुविधांची माहितीही त्यांनी दिली. 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबतही विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

निलेश एच. काळे यांनी प्रत्यक्ष उदाहरणे आणि केस स्टडीच्या माध्यमातून 'सायबर हायजीन' आणि 'सायबर एथिक्स' या संकल्पना समजावून सांगितल्या. डिजिटल जगतात जबाबदार वर्तन, सुरक्षित डिजिटल फूटप्रिंट आणि दैनंदिन जीवनात घडणाऱ्या विविध प्रकारच्या सायबर फसवणुकीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करताना 'झिरो ट्रस्ट' दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला काळे यांनी विद्यार्थ्यांना दिला. अनोळखी लिंक, संदेश, फाइल्स किंवा ऑनलाइन संपर्कांबाबत विशेष काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले. धमकीचे किंवा संशयास्पद संदेश आल्यास त्याला प्रतिसाद न देता तातडीने विश्वासू व्यक्ती किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले. सायबर समस्यांना सामोरे जाताना घाबरू नये किंवा स्वतःला एकटे समजू नये, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

ChatGPT आणि इतर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) साधनांचा शैक्षणिक कामासाठी जबाबदारीने वापर करण्याबाबतही काळे यांनी मार्गदर्शन केले. AI द्वारे मिळालेली माहिती पडताळून पाहणे, त्याचा योग्य पद्धतीने वापर करणे तसेच कॉपीराइट असलेल्या सामग्रीबाबत सावध राहण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध सहभाग नोंदवल्याबद्दल निलेश काळे यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे व्यवस्थापन व शिक्षकवर्ग यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

कार्यशाळेच्या शेवटी प्रश्नोत्तरांचे सत्र घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल सुरक्षिततेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांनी आपला अभिप्राय नोंदवून सायबर सुरक्षा शपथ घेतली आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित, नैतिक व जबाबदार वापर करण्याचा संकल्प केला.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना सायबर धोक्यांविषयी व्यावहारिक माहिती मिळाली असून, वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात सुरक्षित व जबाबदार डिजिटल पद्धती अवलंबण्यास त्यांना प्रोत्साहन मिळाले.

## दिवंगत उदारामजी उके यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त अनागारिक धम्मपाल बौद्ध विहारास १५ हजारांचे धम्मदान



**दै. सिंहवाणी वृत्त, महादुला**

दिवंगत उदारामजी उके यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून आयु. सेसाबाई उके, आयु. प्रमोदभाऊ उके, आयु. मधुबालाताई उके व समस्त उके परिवार यांच्या वतीने अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार, महादुला येथे रु. १५,०००/- (पंधरा हजार रुपये) इतके धम्मदान देण्यात आले. आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीच्या स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी विविध मार्ग अवलंबले जातात, मात्र दिवंगत वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त धम्मकार्यासाठी योगदान देणे, ही सामाजिक बांधिलकीची जोड देणारी भावपूर्ण आदरांजली ठरते. याच भावनेतून उके परिवाराने दिवंगत उदारामजी उके यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून धम्मदान केले. हे धम्मदान केवळ आर्थिक योगदान नसून वडिलांप्रती असलेली कृतज्ञता, बुद्धांच्या धम्माप्रती असलेली निष्ठा आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचे प्रतीक आहे. आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृतींना धम्मकार्याशी जोडत उके परिवाराने बौद्ध विहाराच्या धार्मिक, सामाजिक व धम्मविषयक उपक्रमांना हातभार लावला आहे. त्यांच्या स्मृतींचे हे धम्मरूपी स्मरण पुढील पिढ्यांनाही सामाजिक बांधिलकी आणि धम्मकार्याची प्रेरणा देणारे ठरत आहे.

आयु. प्रमोदभाऊ उके हे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह समिती, महादुला या समितीचे माजी अध्यक्ष राहिले असून, त्यांच्या अध्यक्षतेच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार, जयंती समारोहाचे आयोजन तसेच विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय योगदान दिले. यावेळी अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार समिती, महामाया महिला मंडळ तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह समिती, महादुला यांच्या वतीने उके परिवाराचे आभार मानण्यात आले.

# महावितरण नागपूर प्रादेशिक आंतर परिमंडळीय नाट्य स्पर्धा

### 'थलाई कुथल' व 'एक होती राणी' नाटकांमधून अनिष्ट सामाजिक कुप्रथांवर प्रहार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणच्या नागपूर प्रादेशिक आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी अमानुष सामाजिक रुढी आणि गंभीर नैतिक समस्यांवर बोट ठेवणाऱ्या दोन अत्यंत संवेदनशील नाटकांचे सादरीकरण झाले. रंगमंचावर सादर झालेल्या 'थलाई कुथल' आणि 'एक होती राणी' या नाटकांनी आपल्या आशयघन कथावस्तूच्या बळावर उपस्थितांची मने जिंकून घेतली आणि प्रेक्षकांना एकाच वेळी भारावून टाकत अंतर्मुख होण्यास भाग पाडले.



**'थलाई कुथल'मधून सत्तीच्या इच्छामरणाच्या दाहक वास्तवावर प्रकाश**

दिवसाच्या पहिल्या सत्रात नागपूर परिमंडलातर्फे महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत यशाची मोहोर उमटवणारे सलीम शेख लिखित 'थलाई कुथल' हे नाटक सादर झाले. तामिळनाडूतील ग्रामीण भागात वृद्ध किंवा आजारी व्यक्तींना दिली जाणारी अमानुष 'सत्तीच्या इच्छामरणाची' प्रथा म्हणजेच 'थलाई कुथल' होय. गरिबी आणि औषधोपचाराचा खर्च न पेलल्यामुळे स्वतःच्याच वृद्धांना मृत्यूच्या दारात ढकलले जाण्याची दाहक वस्तुस्थिती या नाटकाने रंगमंचावर जिवंत केली. एका बाजूला वृद्धांवरील प्रेम आणि दुसऱ्या बाजूला गरिबीची लाचारी यांच्यातील मानसिक ओढाताण कलाकारांनी ताकदीने मांडली. गरिबीची लाचारी कितीही भीषण असली तरी अनिष्ट परंपरांचा त्याग करून वृद्धांप्रती आपुलकी व नैतिक जबाबदारी जपणे आवश्यक आहे, हा मोलाचा विचार नाटकाने दिला.



**स्त्रीच्या आत्मसन्मानाचा लढा उभा करणारे 'एक होती राणी'**

दुसऱ्या सत्रात चंद्रपूर परिमंडलातर्फे प्रकाश गडदे लिखित 'एक होती राणी' हे नाटक रंगमंचावर सादर करण्यात आले. हे नाटक पंजाबातील एका खेड्याच्या पार्श्वभूमीवर अमानुष सामाजिक रुढी, कौटुंबिक संघर्ष आणि स्त्रीच्या अस्तित्वाचा लढा अत्यंत प्रभावीपणे मांडणारे ठरले. पतीच्या आकस्मिक मृत्यूनंतर, अनिष्ट परंपरेचा बळी ठरून स्वतःच्या देवराशी 'चादर पांघरून' जबरदस्तीने विवाहबद्ध व्हावे लागलेल्या 'रानो'चा हा आत्मसन्मानाचा संघर्ष होता.

आई-मुलाचे पवित्र नाते एका रात्रीत बदलल्यामुळे निर्माण झालेला वेदनादायी ताणतणाव आणि मुलीचा तीव्र विरोध या सर्वांवर रानो व तिचा देवर मंगल अत्यंत संयम, त्याग आणि खंबीरपणाने मात करतात. कोणत्याही बिकट परिस्थितीत स्त्रीचा स्वाभिमान, तिची इच्छा आणि तिच्या भावनांचा सन्मान केलाच पाहिजे; तसेच नात्यांचे खरे सौंदर्य व पवित्रता केवळ सामाजिक बंधनात नसून त्याग आणि आदरात वसलेले असते, हा महत्त्वपूर्ण संदेश या नाटकाने दिला.

दोन्ही नाटकांच्या कसदार अभिनयाने आणि प्रभावी आशयाने दुसऱ्या दिवशीही नाट्यप्रेमींची व परीक्षकांची भरभरून दाद मिळवली.

थोडक्यात

## सालेकसा ग्रामीण रुग्णालयात ३० सप्टेंबरला भव्य आयुष आरोग्य शिबिर

### नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणीसह आयुर्वेद, योग, युनानी व होमिओपॅथी उपचाराची सुविधा




**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या राष्ट्रीय आयुष मिशन अंतर्गत तसेच आरोग्य विभाग, जिल्हा गोंदिया यांच्या वतीने बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, सालेकसा येथे मोफत आयुष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरात सर्व नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांकडून सल्ला आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, वजन व इटक तपासणी करण्यात येणार असून, गरजेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जाणार आहे. शिबिरात आयुर्वेदिक पंचकर्म सल्ला व औषधोपचार, योगाभ्यास, प्राणायाम, ध्यान व जीवनशैली मार्गदर्शन, युनानी पद्धतीने तपासणी व उपचार तसेच होमिओपॅथी तपासणी व मोफत औषध वितरण अशा विविध सेवा उपलब्ध राहणार आहेत.

यासोबतच नागरिकांना पोषण आहार व आरोग्यविषयक जनजागृती, योग व जीवनशैली प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरास मार्गदर्शन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प. के. पाटले, गोंदिया यांचे लाभणार आहे.

## नागपूरच्या कवयित्री आरती झोटिंग यांना 'सरफोजीराजे साहित्यरत्न' पुरस्कार प्रदान!

### 'मनकवडसा' काव्यसंग्रहाचा तंजावर येथील दुसऱ्या मराठी साहित्य संमेलनात बहुमान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या सुप्रसिद्ध कवयित्री आरती झोटिंग यांच्या 'मनकवडसा' या काव्यसंग्रहाला तंजावर (तमिळनाडू) येथे आयोजित दुसऱ्या



'सरफोजीराजे मराठी साहित्य संमेलनात' 'सरफोजीराजे साहित्यरत्न पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा दिमाखदार सोहळा पार पडला. संमेलनाचे उद्घाटक छत्रपती बाबाजीराजे भोसले, स्वागताध्यक्ष प्रा. लक्ष्मणराव ढोबळे आणि निमंत्रक युवराज संभाजीराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत कवयित्री आरती झोटिंग यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर मराठी साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगी काळभोर, राष्ट्रीय विश्वस्त पल्लवीताई गोरे, सुप्रसिद्ध साहित्यिका प्रा. दीप्ती पाटील, विक्रम शिंदे, विकास भोसले, कर्नाटक प्रदेशाध्यक्ष रवींद्र पाटील तसेच उद्योगपती अप्पासाहेब गुरव यांसारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. मराठी साहित्यातील अमूल्य योगदानाबद्दल आणि 'मनकवडसा' या संग्रहातील संवेदनशील काव्यरचनेबद्दल आरती झोटिंग यांच्यावर साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नागपुरात 'डाक अदालत'चे आयोजन, ३० सप्टेंबरपर्यंत तक्रारी पाठवण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टपाल विभागाच्या सेवेबाबत नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी येथील अधीक्षक, आरएमएस 'एफ' विभाग, यांच्या कार्यालयात दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता 'डाक अदालत'चे आयोजन करण्यात आले आहे. टपाल सेवेतील कामकाजाबाबत तीन आठवड्यांत ज्या तक्रारींचे निवारण झालेले नाही किंवा समाधानकारक उत्तर मिळालेले नाही, अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. यात प्रामुख्याने टपाल, स्पीड पोस्ट, पार्सल यासंबंधीच्या तक्रारींचा समावेश असेल.

नागरिकांनी आपल्या तक्रारीत मूळ तक्रार पाठवल्याची तारीख, संबंधित अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा यासह संपूर्ण तपशील नमूद करणे आवश्यक आहे. ही तक्रार दोन प्रतींमध्ये "श्री. गणेश बी. अंभोरे, अधीक्षक, आरएमएस 'एफ' विभाग, पहिला मजला, जीपीओ परिसर, नागपूर - ४४०००१" या पत्त्यावर दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे डाक विभागाकडून कळवण्यात आले आहे.

## मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान सहली'चे आयोजन, जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालयाचा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून पर्यटन संचालनालय, नागपूर प्रादेशिक कार्यालय, आणि रमण विज्ञान केंद्र यांच्या वतीने आज दि २९ रोजी मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान सहली'चे आयोजन करण्यात आले. रेशीमबाग येथील कल्याण मूकबधिर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे असे ६४ विद्यार्थ्यांनी या सहलीत सहभागी झाले होते. २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संस्थेद्वारे यावर्षी जागतिक पर्यटन दिनाचे "Digital Agenda and Artificial Intelligence to Redesign Tourism - पर्यटनाची पुनर्रचना करण्यासाठी डिजिटल अजेंडा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे घोषवाक्य होते. या घोषवाक्यास अनुसरून, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर तसेच क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी व प्रोत्साहन मिळावे तसेच विज्ञान आधारित प्रयोगांबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्देशाने रमण विज्ञान केंद्र येथे ही सहल आयोजित करण्यात आली होती.

# ओबीसींच्या सर्वांगीण विकासासाठी एक रुपयात जागा

### उपसमितीच्या बैठकीत चंद्रशेखर बावनकुळेंचे निर्देश, इतर समाजाप्रमाणे सर्व सुविधा देण्याच्या सुचना, महाज्योतीसाठी ३०० कोटींचा निधी, महात्मा फुले त्रिशताब्दी वर्षानिमित्त उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाच्या सर्वांगीण विकासासह विद्याथ्यार्ना सुविधा पुरवण्यासाठी महसूलसह सर्व शासकीय विभागांच्या जागा एक रुपये दरात उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. गेल्या बैठकीत चर्चा झालेल्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेताना प्रशासनाची चालढकल खपवून घेतली जाणार नाही. ओबीसींच्या विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

इतर समाजाला ज्याप्रमाणे सुविधा व निधी उपलब्ध करून दिला जातो, त्याच धर्तीवर ओबीसी समाजालाही सर्व सुविधा प्राधान्याने देण्यात याव्यात, अशी स्पष्ट सूचना त्यांनी केली.

ओबीसी समाज मंत्रिमंडळ उपसमितीची पाचवी बैठक मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विविध १२ मुद्द्यांवर चर्चा झाली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांच्यासह इमाव विभागाचे उपसचिव, सहसचिव व विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, मंत्रीमंडळ उपसमितीच्या प्रत्येक बैठकीत किमान दोन प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आले पाहिजेत. त्याबरोबरच परदेशी शिष्यवृत्तीचा प्रस्ताव तातडीने मंजूरीसाठी पाठवावा. ओबीसी समाजातील आत्महत्या केलेल्या १६ नावांसह पुढील समितीत प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात यावा. महाज्योतीसाठी ३०० कोटींचा निधी, वसतीगृह योजना, वनार्टी यांचे सर्व प्रस्ताव मंजूरीसाठी देण्यात यावेत.

वनमंत्री गणेश नाईक यांनी ओबीसी समाजाचा शासकीय सेवेतील प्रलंबित असणारा संपूर्ण बँकलॉग त्वरित भरून काढण्याची आग्रही मागणी केली. इतर घटकांप्रमाणेच ओबीसी समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर ओबीसी महामंडळालाही सर्व सोयी-सुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली. 'बार्टी'च्या धर्तीवर 'क्रांतीज्योती महात्मा फुले समता भवन' सुरू करण्यात यावे व त्यासाठी २०० कोटी रुपयांची भरीव तरतूद करून पुढील बैठकीत सादरीकरण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महात्मा फुले लिखित 'तृतीय रत्न' या नाटकाच्या राज्यभरातील प्रयोगांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची सूचनाही भुजबळ यांनी केली.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या संदर्भात बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, महात्मा फुले यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त त्यांचा समग्र ग्रंथ प्रकाशित करणे, भव्य चित्ररथ तयार करणे, जीवनावर आधारित कॅलेंडर प्रकाशित करणे आणि नागपूर येथे विशेष मॅरेथॉनचे आयोजन करण्याचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## खरीप पिक कर्ज वाटपाचे प्रमाण वाढवा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

खरीप हंगामात पिक कर्ज वाटपाचे प्रमाण वाढवण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित यंत्रणेला दिले. अपेक्षित पिक कर्ज वाटप न करणाऱ्या बँकांमधील शासकीय विभागांनी आपली खाती बंद करून, कर्जवाटपात सहकार्य करणाऱ्या बँकांमध्ये नवी खाती सुरू करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी विभागांना केल्या.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि ०९ सप्टेंबर २०२६ रोजी अग्रणी बँक प्रबंधक कार्यालय व विविध विभाग प्रमुखांकडून पिक कर्ज वाटपाबाबत आढावा घेतला.



चालू खरीप हंगामासाठी जिल्ह्याला १ हजार ५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत १ हजार ६६ कोटी रुपयांचे वाटप पूर्ण झाले असून, हे प्रमाण उद्दिष्टाच्या ७१ टक्के आहे. बँकाकडून अपेक्षित कर्जवाटप करण्यात यावे याबाबत व अपेक्षित कर्जवाटप होऊ न शकलेल्या बँकांना जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या. शासकीय विभागांनी त्यांची खाती कर्जवाटप करणाऱ्या बँकांमध्ये वर्ग करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे यावेळी त्यांनी निर्देश दिले. बांधकाम क्षेत्राशी संबंधित 'नारेडको' आणि क्रेडाई' यांनाही या बाबत पत्राद्वारे कळविण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील बँकनिहाय खरीप पिक कर्ज वाटपाची माहिती पुढीलप्रमाणे आहे. सेंट्रल बँकेने १०१ टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. बँक ऑफ महाराष्ट्र ९५ टक्के, पंजाब नॅशनल बँक ८७ टक्के, बँक ऑफ इंडिया ८४ टक्के, युनियन बँक ऑफ इंडिया ८४ टक्के, इंडियन बँक ८४ टक्के, कॅनरा बँक ८० टक्के, इंडियन ओव्हरसीज बँक ८० टक्के, बँक ऑफ बडोदा ७६ टक्के, स्टेट बँक ६८ टक्के आणि युको बँकेने ५२ टक्के वाटप केले आहे. कर्नाटक बँक २३२ टक्के आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने १०३ टक्के वाटप केले आहे.

आयडीबीआय बँकेने ३२ टक्के, एचडीएफसी बँक २८ टक्के, आयसीआयसीआय बँक २७ टक्के, अँक्सिस बँक ७ टक्के, इंडसइंड बँक ५ टक्के, आयडीएफसी फर्स्ट बँक ४ टक्के आणि आरबीएल बँकेने ४ टक्के कर्जवाटप केले. डीसीबी बँक, फेडरल बँक, कोटक महिंद्रा बँक आणि साऊथ इंडियन बँक यांचे कर्जवाटप शून्य टक्के असल्याचे संबंधित यंत्रणेने कळविले आहे.

जिल्ह्यातील सर्व बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत सकारात्मकतेने त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

## देखभाल व दुरुस्तीसाठी काँग्रेसनगर आणि महाल विभागात आज वीज पुरवठा तात्पुरता खंडित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामामुळे बुधवार दि. ३९ सप्टेंबर २०२६ रोजी काँग्रेसनगर आणि महाला विभागातील काही वाहिन्यांचा वीज पुरवठा काहीं तासांकरिता तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे. काँग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते १० या वेळेत चिंचभवन, सराफ फोर्ट, सकाळी ७:३० ते ११ या वेळेत दीक्षाभूमी, सकाळी ८ ते ११ यावेळेत विद्यापीठ परिसर, सकाळी ८:३० ते ११:३० या वेळेत पडोळे चौक, मॉडर्न सोसायटी, विद्या विहार, पन्नासे लेआऊट, हिरणावर लेआऊट, आनंद नगर, घरकुल परिसर, पावनभूमी, कर्वे नगर, उज्वल नगर, राहुल नगर, मेहर नगर, पर्यावरण सोसायटी, सुमित नगर, अध्यापक लेआऊट, आझाद हिंद नगर, पाण्याची टाकी, टाकली सिम, आदिवासी लेआऊट, एलआयजी, एमआयाजी कॉलनी, सुर्वे नगर आणि सोमालवाडा परिसरातील वीज पुरवठा बंद राहिला

महाल विभागात सकाळी १० ते १०:३० या वेळेत केएनए बिल्डिंग हल्दीराम, विनायक टॉवर, रिलायन्स टॉवर, दिव्यांग वस्तीगृह, पडोळे कॉर्नर, चंदन नगर, महेश कॉलनी, वकील पेठ, रेणुका अपार्टमेंट, राम मंदिर आणि सभोवतालचा परिसर, सकाळी ८ ते ११ या वेळेत शारदा चौक, स्मृती मंगल कार्यालय, खानखोजे नगर, साई मंदिर, जवाहर नगर, चक्रधर नगर, स्टेट बँक, आदर्श सभागृह, जुने कैलाश नगर, सकाळी १० ते २ या वेळेत संत्रा मार्केट, एम्प्रेस मॉल, न्यू इंग्लिश, रेल्वे, गणेशपेठ, महाल, मॉडेल मिल, डी मूर्ती, इमामवाडा, सकाळी ९ ते १ यावेळेत भोले बाबा नगर, संतोषी नगर, पाण्याची टाकी, रामभाऊ म्हाळगी नगर, कॉर्पोरेशन कॉलनी, बडवाईक डेअरी या भागातील वीज पुरवठा बंद राहील.

## फिल्म 'श्री हनुमान अंश' के संगीतकार धीरेन्द्र मुलकलवार ने सहपरिवार किए जामसांवली धाम में दर्शन

### भावपूर्ण भजन प्रस्तुति से भक्तिमय हुआ हनुमान लोक

**दै. सिंहवाणी वृत्त, जामसावली**

चमत्कारिक एवं प्रसिद्ध धार्मिक स्थल श्री हनुमान मंदिर, हनुमान लोक जामसांवली धाम में मंगलवार को भक्ति और आध्यात्मिकता से परिपूर्ण वातावरण देखने को मिला। सुप्रसिद्ध फिल्म श्री हनुमान अंश के संगीतकार श्री धीरेन्द्र मुलकलवार ने सहपरिवार जामसांवली धाम पहुंचकर श्री हनुमान जी के दर्शन किए और विधि-विधानपूर्वक पूजा-अर्चना कर आशीर्वाद प्राप्त किया।

जामसांवली धाम पहुंचने पर श्री धीरेन्द्र मुलकलवार ने मंदिर में विराजमान श्री हनुमान जी की श्रीमूर्ति के समक्ष श्रद्धापूर्वक पूजा-अर्चना की। उन्होंने भगवान श्री हनुमान जी से देश, प्रदेश एवं क्षेत्र की सुख-समृद्धि, शांति और खुशहाली की कामना की। धार्मिक वातावरण से प्रभावित होकर उन्होंने धाम की आध्यात्मिक महत्ता की भी सराहना की। पूजा-अर्चना के पश्चात संगीतकार धीरेन्द्र मुलकलवार ने अपनी मधुर आवाज में प्रसिद्ध भजन सिया वर रामचंद्र की जय–सीताराम की सुंदर एवं भावविभोर प्रस्तुति दी। जैसे ही भजन के स्वर मंदिर परिसर में गूंजे, पूरा वातावरण भक्तिमय हो गया। उपस्थित श्रद्धालु भक्ति में लीन नजर आए और भगवान श्रीराम एवं श्री हनुमान जी के जयकारों से वातावरण गूंज उठा।

उनकी भावपूर्ण भजन प्रस्तुति ने श्रद्धालुओं का मन मोह लिया। संगीत और भक्ति के इस सुंदर संगम ने जामसांवली धाम में मौजूद श्रद्धालुओं के लिए इस अवसर को विशेष एवं यादगार बना दिया। इस अवसर पर हनुमान



लोक संस्थान के अध्यक्ष श्री गोपाल शर्मा सचिव श्री टीकाराम कारोकर एवं सीईओ श्री वीरेंद्र भट्ट द्वारा श्री धीरेन्द्र मुलकलवार का आत्मीय स्वागत एवं सम्मान किया गया। संस्थान की ओर से उन्हें श्री हनुमान जी की श्रीमूर्ति की प्रतिकृति भेंट कर अभिनंदन किया गया।

श्री मुलकलवार ने सहपरिवार जामसांवली धाम पहुंचकर श्री हनुमान जी के दर्शन एवं पूजा-अर्चना को अपने लिए श्रद्धा और सौभाग्य का अवसर बताया। इस दौरान परिवार के सदस्यों ने भी मंदिर में दर्शन कर पूजा-अर्चना की। जामसांवली धाम की पावन भूमि पर फिल्म जगत से जुड़े प्रसिद्ध संगीतकार की यह धार्मिक यात्रा श्रद्धालुओं के बीच भी चर्चा का विषय रही। भजन प्रस्तुति और सम्मान समारोह ने पूरे आयोजन को और भी भक्तिमय बना दिया।

## १२ वी च्या विद्यार्थ्यांनी घेतले पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचे "वर्दीतल्या माणसांच्या नोंदी" पुस्तक

### राष्ट्रीय आदर्श विदयालय व कनिष्ठ महाविद्यालयातील उपक्रम, पुस्तकं आयुष्य घडवितात : एपीआय स्वाती यावले, पोलीस दलात कार्य करून राष्ट्रासेवा करा : प्राचार्य रविंद्र चन्ने

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रीय आदर्श विदयालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे वर्ग १२ वी कला शाखेत नावीन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत विद्याथ्यार्ना पुस्तकं वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच गुणवंत पिढी घडावी यासाठी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचे "वर्दीतल्या माणसांच्या नोंदी ", हे पुस्तकं वाचणासाठी स्वतःहुन विकत घेतले. या



उपक्रमाप्रसंगी एपीआय स्वाती यावले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्राचार्य रविंद्र चन्ने यांच्या मार्गदर्शन व अध्यक्षतेखाली पुस्तकांची प्रत देण्यात आली. यावेळी होमगार्ड पुष्पा महादुले व पर्यवेक्षक शैलेश परमार उपस्थित होते.

याप्रसंगी एपीआय स्वाती यावले म्हणाल्या की, "पुस्तकं विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवितात. पोलीस विभाग समाजाची सुरक्षा आणि प्रगतीसाठी सतत कार्यरत असतो. समाजात एकोपा नांदावा, शांतता राहावी तसेच कुणावरही कोणत्याही प्रकारचा अन्याय आणि अत्याचार होऊ नये यासाठी कार्य करीत असतो. सत्य व न्यायाचे रक्षण करण्यासाठी पोलीस यंत्रणा कार्यक्षम पद्धतीने कार्य करीत राहते. प्रत्येक भारतीय नागरिकाला शांत, समृद्ध आणि समाधानी आयुष्य जगण्यासाठी सतत लढावू बाणा ठेवून कार्यरत राहते. आदरणीय पोलीस महासंचालक सदानंद दाते सरांच पुस्तक आपल्याला जगण्याची प्रेरणा आणि आयुष्याला दिशा देईल असा विश्वास वाटतो."

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना प्राचार्य रविंद्र चन्ने म्हणाले की. "महाराष्ट्र शासनाचा पोलीस विभाग खुप प्रभाविपने कार्य करून जनतेची सेवा करतो. नागरिकांना सुरक्षेच्या विविध सेवासुविधा पुरविते. सदानंद दाते सरांचं पुस्तकं अनुभवाचा अनमोल खजिना आहे. ज्यात त्यांनी हृदयाला स्पर्श करणारे अनेक घटना प्रसंग सांगितलेले आहेत. आपणही पोलीस दलात विविध पदावर कार्यरत राहून समाजाची व राष्ट्राची सेवा करावी."

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षी मराठी विषयाचे वेगवेगळे उपक्रम डॉ. जगदीश गुजरकर यांच्या मार्गदर्शनात होतात. यावर्षी विध्यार्थ्यांनी पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचे "वर्दीतल्या माणसांच्या नोंदी " हे पुस्तकं विकत घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. जगदीश गुजरकर यांनी केले.